MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात

## वादग्रस्त पोलिस कर्मचारी हनुमंत उगलेवर वरिष्ठ एवढे मेहेरबान का?

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -१०६ | बुधवार दि.०१ जानेवारी २०२५ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -106 | WEDNESDAY DT.01 JANUARY 2025 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# वादग्रस्त पोलीस कर्मचारी हनुमंत उगले वर बलात्कारातील आरोपींना सोडून देण्याचा ठपका तरीही वसुलीसाठी पेठ बीड पोलीस ठाणे का व कोणाच्या आशीर्वादाने?

**भीक मागून जगणाऱ्या मुलीवर बलात्कार करणाऱ्या नराधमांना सोडून देणाऱ्या पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हनुमंत उगलेला हप्ता वसुलीसाठी परवानगी कोणी दिली का? एस पी नवनीत कॉवत साहेब एकदा पेठ बीड ठाण्यातील कथित सामूहिक मनोरुग्न अल्पवयीन मुलींवरील बलात्कार प्रकरण आपण तपासणी गरजेचे?**







- वादग्रस्त पोलीस कर्मचारी हनुमंत उगले बद्दल अनेकांच्या तक्रारी गुप्त अहवाल तत्कालीन पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांना पाठवला होता. परंतु त्यानंतर नंदकुमार ठाकुर यांची बदली झाली व नवनिर्वाचित पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांनाही यासंबंधी माहिती होती परंतु त्यांची बदली झाल्यानंतर नवनिर्वाचित पोलीस अधीक्षक नवनीत कावत साहेब ही कारवाई करतील साय दैनिक महाराष्ट्र आरंभ शी बोलताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज यांनी दिली माहिती होणार आहे.
- पेठ बीड पोलीस ठाण्याचे पीआय अशोक मुदिराज पिएस आय रमेश उबाळे हनुमंत उगले ला राजकीय वरदहस्त पुन्हा पेठ बीड पोलीस ठाण्यात वाल्मीक कराडांच्याच आशीर्वादाने एका पत्रकाराने केली होती मध्यस्ती पेठ बीड पोलिसात चर्चेत हनुमंत उगले ओरडू लागला हम किसीसे कम नही? वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज हनुमंत उगले चे फोन कॉल डिटेल तपासणी गरजेचे हप्त्या सह अनेक तडजोडी बाहेर निघतील कोणाला व्हाट्सअप वर फोन कॉल केले हे तपासणी गरजेचे?
- आरोपींना पोलीस ठाण्यात आणून आर्थिक तडतोड करत सोडून का दिले पोलीस स्टेशन डायरीला नोंद का घेतली नाही याच उत्तर होम डिव्हायएसपी उमेश कस्तुरे यांनी द्यावं? भीक मागून जगणाऱ्या मुलीवर तीन नराधमांनी बलात्कार करणे केला होता त्यांना सोडून देण्याचं पाप पेठ बीड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज हनुमंत
- उगले रमेश उबाळे सानप नावाच्या पोलिसांनी केलं होतं त्यांना पुन्हा पोलीस ठाणेच का?
- पेठ बीड पोलीस ठाण्यातील वाळू माफियांचे कलेक्शन एस पी साहेब नेमके कुणासाठी
- वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज फौजदार रमेश उबाळे हनुमंत उगले सहसानप होम डिएसपीच्या चौकशीत उघड झाले पण पुन्हा पेठ बीड पोलीस ठाणे हप्ते वसुलीसाठीच का?
- वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज यांच्या जवळचा फक्त फिरवून ड्युटी करणारा पोलीस म्हणून हनुमंत उगले लाडाचा का?
- हनुमंत उगले ला कोणतीही जबाबदारी देणे अगोदर वरिष्ठ पोलीस कर्मचाऱ्यांना विचार करावा लागतो राजकीय वरदहस्त का आर्थिक तडजोडी मधला बादशाह हनुमंत उगले? अनेक वरिष्ठ पोलीस अधिकारी कर्मचारी यांना अरेरावीची भाषा वापरणारा वादग्रस्त पेठ बीड पोलीस हनुमंत उगलेला पैसा गोळा करण्यासाठी पेठ बीड पोलीस ठाणे मध्ये ठेवल्यामुळे वरिष्ठ पोलीस कर्मचारी यांना त्याची अरेरावेची भाषा सहन करावी लागते?

बीड ।प्रतिनिधी

कथित मनोरुग्न अल्पवयीन मुलीवर सामूहिक सामूहिक बलात्काराची घटना काही महिन्यापूर्वी घडली होती. तत्कालीन पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी साय दैनिक महाराष्ट्र आरंभाच्या बातम्या ची दखल घेत संबंधित प्रकरणात कडक कारवाईचे आदेश दिले होते. व पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीत मध्यरात्री एक घटना घडली होती. संबंधित घटना घडल्यानंतर त्या ठिकाणी रंगेहाथ तीन नराधन अल्पवयीन मनोरुग्न वेडसर मुलीवर बलात्कार करत होते. हे पाहणारे व घटनास्थळी उपस्थित असलेले मध्यरात्रीच्या वेळेस इमामपूर प्रकाश आंबेडकर नगर मधील चोरांच्या भीतीची अफवा असल्यामुळे त्या ठिकाणी या भागातील लोक रात्रीच्या वेळी जास्त घालत होते डायल ११२ वरती कॉल करत एका नागरिकांनी संबंधित माहिती पोलीस प्रशासनाला दिली होती. त्या ठिकाणी डायल ११२ वरती कॉल गेल्यानंतर व नाईट ड्युटी वरती पेठ बीड पोलीस ठाण्याचे पीएसआय रमेश उबाळे हनुमंत उगले हे संबंधित ठिकाणी गेले त्या ठिकाणी नराधन आरोपींची मोटरसायकल व तीन आरोपीही होते पीडित मुलगी ही अल्पवयीन मनोरुग्न बोळसर वेडसर सापडल्या नंतर तिला पेठ बीड पोलीस स्टेशन येथे रात्रीच्या वेळेस आणण्यात आले. परंतु नाईट ड्युटी वरती ठाणे आमदार असलेले सानप नावाचे पोलीस कर्मचारी यांनी संबंधित मुलीला बीड बीड पोलीस ठाण्यामध्ये तीन आरोपी नराधमान सोबत आणल्यानंतर बीड पोलीस ठाण्याचे फौजदार रमेश उबाळे व हनुमंत उगले यांनी आर्थिक तडजोड करत त्या ठिकाणावरून सोडून दिल्याचा धक्कादायक प्रकार पोलीस स्टेशनमध्ये आणून जर आरोपींना सोडून देत असतील तर नेमका विश्वास कोणावरती ठेवायचा असा प्रश्न पडलेला आहे. पेठ बीड पोलीस स्टेशन ठाण्याचे नाईट ड्युटी वरती असलेले पीएसओ सानप यांनी संबंधित पोलीस कर्मचारी म्हणजेच फौजदार रमेश उबाळे हनुमंत उगले यांना कोणीच पोलीस स्टेशन पेठ बीड ठाण्याच्या स्टेशन डायरीला नोंद घेतली का नाही असा प्रश्न उपस्थित केला आहे तर नराधम बलात्काराच्या प्रकरणातील आरोपातील आरोपींना सोडून देण्यात आले होते. संबंधित तडजोड ही तीन आरोपींची प्रत्येकी ८० हजार रुपयांनी ठरली होती?

याचीच एक बाब म्हणून या ठिकाणी संबंधित प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला परंतु सायं दैनिक महाराष्ट्र आरंभ व इतर मीडियाने संबंधित प्रकरण उचलून धरल्यानंतर तत्कालीन एस पी नंदकुमार ठाकूर यांनी चौकशी समिती नेमली होती. या चौकशी समितीचे प्रमुख होम डिव्हायएसपी उमेश कस्तुरे हे होते उमेश कस्तुरे यांनी संबंधित प्रकरणाची चौकशी करत असताना पेठ बीड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज पेठ बीड पोलीस ठाण्याचे फौजदार रमेश उबाळे पोलीस कर्मचारी हनुमंत उगले व नाईट ड्युटी वरती पेठ बीड पोलीस ठाण्याचे ठाणे अंमलदार पी एस ओ सानप यांची संबंधित प्रकरणात चौकशी केली होती. या प्रकरणी चौकशी समितीचे प्रमुख व बीड चे होम डिव्हायएसपी उमेश कस्तुरे यांनी सांगितले की संबंधित लोक हे दोषी आढळले आहेत. आणि त्यांचा अहवाल आय जी कडे पाठविण्यात आलेला आहे. परंतु दोषी आढळल्यानंतर सुद्धा त्यांच्यावरती बदलीची किंवा निलंबनाची कारवाई का नाही असा प्रश्न या ठिकाणी जनता करत आहे. तर तत्कालीन पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी पोलीस ठाण्याचे अशोक मुदिराज व फौजदार रमेश उबाळे हनुमंत उगले या दिवशी पोलीस कर्मचाऱ्यांना पुन्हा पेठ बीड पोलीस ठाणे हे पैसे कमी होण्यासाठी दिले आहे. का असा सवाल होत आहे. तर तत्कालीन पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी कारवाई केली होती. परंतु ती रद्द करण्यासाठी तत्कालीन पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांच्या वरती वाल्मीक कराड करून दबाव आणण्याची चर्चाही पेठ बीड पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्यांच्या चर्चा रंगू लागल्या आहेत. त्यामुळे आता संबंधित प्रकरणाकडे नवनिर्वाचित पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत साहेब हे कारवाई करतील का व मनोरुग्ण अल्पवयीन मुलीवर झालेल्या बलात्कारातील नराधमांकडून आर्थिक व्यवहार करत सोडून देणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांना शिक्षा करतील का असा सवाल या ठिकाणी जनतेतून होत आहे.

पेठ बीड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज यांचे वरदहस्त लाभलेला पोलीस कर्मचारी हनुमंत उगले नंगानाच करत आहे याचा नंगानाच हा पेठ बीड पोलीस ठाण्यातील सर्व आर्थिक व्यवहाराशी निगडित आहेच?ते पेठ बीड पोलीस ठाण्यातील अनेक आर्थिक व्यवहार हप्ते वसुली करण्याची जिम्मेदारी देण्यात आलेली आहे. कथित सामूहिक मनोरुग्ण अल्पवयीन मुलीवरील बलात्कार प्रकरणात संबंधित फिर्यादी करण्यात आलेले आहे. या प्रकरणी हनुमंत उगलेलाच पोलिसाच्या वतीने फिर्यादी करण्यात आलेली आहे.



## हनुमंत उगले साहेब कुणाच्या लेकी बाळीचा तळतळाट घेवू नका?

## आरोपींना पाठीशी घालुन पैसा कमवाल हो पण नितीमत्तेचे काय?

## बड्या धेंड्यांना वाचविण्यासाठी गोर गरीबांच्या लेकीची आब्रु वेशीवर टांगता की काय?

हे जनतेला रोड बंगाल कळालेले आहे कारण हनुमंत उगले आणि संबंधित अनाराधम आरोपी हे सोडून दिलेले असताना तत्कालीन एसपी नंदकम ठाकूर यांनी कारवाई केली होती. परंतु ती कारवाई रद्द करण्यासाठी एका पत्रकाराच्या माध्यमातून वाल्मिक कराड कडून परळी होऊन दबाव तत्कालीन पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांच्या वरती आणला होताह व बलात्कारातील आरोपींना सोडून देण्याचा ठपका ठेवल्या नंतर एक चौकशी समिती नेमली होती. या चौकशी समितीत हनुमंत उगले सह अशोक मुदिरात फौजदार रमेश उबाळे व सानप नावाचे पोलीस जे की रात्री नाईट ड्युटी वरती हे सर्व दोषी आढळलेले असताना सुद्धा त्यांना बीड बीड पोलीस ठाणेच का असावा या ठिकाणी जनतेतून होत आहे. त्यामुळे आता नवनिर्वाचित पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत साहेब यांनी लक्ष घालून संबंधित मनोरुग्ण बलात्कार प्रकरणातील आरोपी सोडून देणाऱ्या पोलीस हनुमंत उगलेला पेठ बीड पोलीस ठाणे कोणाचा आशीर्वाद आहे हे पाहणे व तपासणी गरजेचे आहे. हनुमंत उगले हा राजवषपणे वाळू मुरूम माफियांकडून हत्ती वसुली करत आहे नवनिर्वाचित एस पी च्या कार्यकाळात सुद्धा हप्ते वसुली जोरात चालू आहे.

वादग्रस्त पेठ बीड पोलीस ठाण्याचा पोलीस कर्मचारी हनुमंत उगलेला कधीच सामूहिक मनोरुग्णाला मुलीवरती बलात्कारातील आरोपी सोडून देण्याचा ठपका आहे. तर संबंधित या प्रकरणांमध्ये हनुमंत उगलेच फिर्यादी पण पोलिसांमार्फत झालेला आहे. परंतु पेट बीड पोलीस, गुटखा मटका जनावरांची तस्करी वाळू दगड सह पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीतील अनेक अवैध धंदे दारू, पत्त्याचे क्लब मटक्याचे क्लब गुटका माफिया वाळू माफिया मुरू माफिया या सर्वांकडून हप्ते वसुलीची व पेठ पुलिस ठाण्यात हद्दीतील कत्तल खाण्यातील अवैध व हत्या प्रकरणातील जनावरांची तस्करी करणाऱ्या माफीयांचे हप्ते वसुली करण्याची जिम्मेदारी हनुमंत उगले वरती आहे. हनुमंत उगले हा वरिष्ठ पोलीस निरीक्षक पोलीस ठाण्याचे अशोक मुदिराज यांच्या मर्जीतील पोलीस कर्मचारी दिली जाते मर्जीतील ड्युटी?

# धान-भरडधान्य खरेदीसाठी शासकीय पोर्टलवर नोंदणी करण्यास १५ जानेवारीपर्यंत मुदतवाढ

## अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांची माहिती

मुंबई (प्रतिनिधी)

शासकीय खरेदी केंद्रावर धान/ भरडधान्य विक्रीसाठी शासनाच्या ऑनलाइन पोर्टलवर नोंदणी करणे अनिवार्य आहे. त्याकरिता ३१ डिसेंबरपर्यंतची मुदत होती. मात्र अनेक शेतकरी नोंदणीपासून वंचित असल्याने विविध लोकप्रतिनिधिच्या मागणीस अनुसरून शासनाने नोंदणीसाठी १५ जानेवारी २०२५ पर्यंत मुदतवाढ दिली आहे, अशी माहिती अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री ना. धनंजय मुंडे यांनी दिली आहे.

शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी दर मिळू नये यासाठी महाराष्ट्र राज्य को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन आणि आदिवासी विकास महामंडळाच्या माध्यमातून धान/ भरडधान्य खरेदी केले जाते. त्यासाठी ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया अनिवार्य करण्यात आली आहे. खरीप पणन हंगाम २०२४-२५ मध्ये शेतकरी नोंदणी करता ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत अंतिम मुदत होती. मात्र अनेक भागातील शेतकरी नोंदणीपासून वंचित असल्याने शासनाने नोंदणीसाठी मुदतवाढ द्यावी अशी मागणी अर्थ व नियोजन विभागाचे राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, माजी मंत्री व ज्येष्ठ



सदस्य सुधीरभाऊ मुनगंटीवार, आ. राजू कारेमोरे यांच्यासह विविध लोकप्रतिनिधींनी केली होती. या मागणीस अनुसरून शेतकरी नोंदणीची मुदत १५ जानेवारी २०२५ पर्यंत वाढवण्यात आली आहे. याबाबत अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या उपसचिव राजश्री सारंग यांनी महाराष्ट्र राज्य कोऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन आणि महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळासह संबंधित एजन्सी यांना याबाबत कळवले आहे. ही मुदतवाढ अंतिम असून विहित मुदतीत शेतकऱ्यांनी नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे



राम ससाने सेवक संस्थेतील प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाल्यानंतर सेवापूर्ती समारंभ आयोजित केला होता या कार्यक्रम प्रसंगी ससाणे यांचा सपत्नीक सत्कार करताना पत्रकार नितीन कांबळे, स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे दीपक गरुड, झुंज मराठी संदीप जाधव, पत्रकार संतोष ससाने जाधव सर, अनिल मोरे अदि छायाचित्र ( सुरेश कांबळे आष्टी)



आष्टी प्रतिनिधी–स्टेट बँक ऑफ इंडिया कडा शाखा चे मॅनेजर मा श्री.नवनाथजी शेळके साहेब यांच्याकडून नवीन वर्षाच्या निमित्ताने एस.बी.आय बँकेची डायरी व कॅलेंडर देऊन शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी मा.जिल्हा परिषद सदस्य रवि काका ढोबळे, पत्रकार किरण जावळे सर दिसत आहेत

# शेख अशफाक यांना द स्कूल एक्सप्रेस चा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर

बीड (प्रतिनिधी)

तालुक्यातील आहेर चिंचोली येथील श्री. नारायणा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे सहशिक्षक शेख अशफाक अहेमद कय्युम यांना साप्ताहिक द स्कूल एक्सप्रेस चा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. बीड तालुक्यातील आहेर चिंचोली येथे असलेल्या श्री. नारायणा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे सहशिक्षक शेख अशफाक अहेमद कय्युम हे सन २००५ पासून सहशिक्षिक पदावर कार्यरत आहेत. गेल्या एकोणीस वर्षांच्या काळात त्यांनी आपल्या अध्यापनाने ग्रामीण



भागातील विद्यार्थी व पालकांच्या मनात आपल्या उत्कृष्ट कार्याने आदर निर्माण केला आहे. विद्यार्थी आणि शिक्षणासाठी ते आपल्याकडून सर्वतोपरी सहकार्य करतात. शिकविण्याच्या लाघवी पद्धतीमुळे ते एक विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून लोकप्रिय आहेत. शिवाय विद्यार्थ्यांना शिक्षणासह इतर उपक्रमात सहभाग घेण्याकरिताही ते नेहमी प्रोत्साहन देतात. त्यांच्या रूपात ग्रामीण भागातील शाळेला सुद्धा एक उत्कृष्ट शिक्षक मिळाल्याने ग्रामीण भागातून शहरी भागात येणाऱ्या विद्यार्थ्यांचा लोंढा थांबविण्यात त्यांना यश मिळाले आहे. त्यांच्या अशाच उत्कृष्ट कार्याची नोंद घेत शिक्षण क्षेत्रात गेल्या पंधरा वर्षांपासून मराठवाडा विभागात शिक्षणाला वाहिलेले एकमेव वृत्तपत्र म्हणून सर्व परिचित असलेल्या साप्ताहिक द स्कूल एक्सप्रेस ने त्यांची यावेळी देण्यात येणाऱ्या आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड केली आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा येत्या दिनांक ०५ जानेवारी २०२५ रविवार रोजी अहेमदनगर रोडवरील शासकीय विश्रामगृह समोर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक भवन, बीड येथे सकाळी ११:०० वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार आहे. मानाच्या या पुरस्कारासाठी सहशिक्षक शेख अशफाक अहेमद कय्युम यांची निवड झाल्याने त्यांच्यावर समाजाच्या सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून पुढील कार्यासाठी सदिच्छा

# बलभीम महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी तीस वर्षानतर साजरा केला गेट-टुगेदर सोहळा

बीड (प्रतिनिधी)

शहरातील नामांकित बलभीम महाविद्यालयात सन १९९०-९५ पर्यंत शिक्षण घेतलेले वाणिज्य शाखेचे विद्यार्थी- विद्यार्थिनींनी तीस वर्षानंतर औरंगाबाद येथे एकत्रित येऊन स्नेह मिलन (गेट-टुगेदर) कार्यक्रम देवगिरी हुरडा पार्टी येथे साजरा केला. शालेय मित्र-मैत्रिणींचा स्नेह मिलन कार्यक्रम आपण नेहमी पहातो किंवा वाचत असतो परंतु महाविद्यालयीन मित्र आणि मैत्रिणींचे गेट-टुगेदर फार कमी होतात. महाविद्यालयीन विद्यार्थी अवघे दोन-पाच वर्ष जरी सोबत राहत असले तरी मैत्रीची नाळ कायम जपणारे मित्र आणि मैत्रिणी आयुष्यभरासाठी मैत्रीचे



ऋणानुबंध जपतात, म्हणूनच हा स्नेहमीलन आदर्श आहे. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला मित्रवर्य स्वर्गवासी रवी दोडके, सुनील चोरडिया, सुचिता कागवटे आणि गुरुवर्य राजहंस सर यांना श्रद्धांजली अर्पित करण्यात आली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. सायली भालेराव यांनी करताना प्रत्येक मित्र आणि मैत्रिणींना मनमोकळे प्रश्न विचारून बोलते केले. यामुळे प्रत्येकाने आजपर्यंतचा प्रवास दिलखुलासपणे मांडला. प्रभावी सूत्रसंचलनामुळे प्रत्येक मित्र-मैत्रिणींचा कंठ दाटून आला. आजपर्यंतच्या आयुष्यात आलेले चढ-उतार सर्व वर्ग मित्रांनी व्यक्त केले. वर्गमित्र ड. शफिक भाऊ, मुकेश देशमुख, बाळासाहेब शेंडकुडे, राधेश्याम कासट, मंगेश कुलकर्णी, फारुख शेख, मंजुषा देशपांडे, अनिता मोहेकर, सीमा महाजन, सायली भालेराव, मनीषा कपाले आणि अनंत सुतनासे यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. तीस वर्षानंतर केलेला हा गेट-टुगेदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बलभीम ऋणानुबंध या व्हाट्सअप ग्रुपचे डमिन अनंत सुतनासे आणि मनीषा कपाले यांनी विशेष परिश्रम घेतले.



भिमाकोरेगाव वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांनी भिमा कोरेगाव येथे उपस्थित राहून शौर्य दिनानिमित्त विजय स्तंभाला आणि शूरवीरांना अभिवादन केले.



मुंबई। आक्रमक, अभ्यासू आणि कायम लोकांच्या गराडयात असणाऱ्या नेत्या म्हणून ज्यांची उभ्या महाराष्ट्राला ओळख आहे, अशा राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांचा मंत्रालयातील चौथा मजला आज पाच वर्षांनंतर पुन्हा एकदा लोकांच्या गर्दीत गजबजून गेल्याचे पहायला मिळाले. या गर्दीने २०१४ ते १९ च्या आठवणी पुन्हा ताज्या केल्या.

# उमापूरच्या भारतीय स्टेट बँकेच्या मॅनेजरचा मुजोरपणा आणि मनमानी कारभार..!

## सर्व सामान्यांना बँक मॅनेजरची अरेरावीची भाषा अशा मुजोर अधिकाऱ्याची तात्काळ बदली करा

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : गेवराई तालुक्यातील उमापूर येथील भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया या शाखेच्या बँक मॅनेजरचा मुजोरपणा आणि मनमानी कारभार सुरू आहे. बँक मध्ये येणाऱ्या सर्व सामान्य माणसाला मूलभूत सुविधा पुरवणे हा बँकेचा नियम आहे. परंतु उमापूर येथील भारतीय स्टेट बँकेचे मॅनेजर हे सर्व सामान्य माणसाला मूलभूत सुविधा पुरवतात दिसून येत नसून, अरेरावीच्या भाषेत उत्तरे देत असल्याचे बोलले जात आहे. भारतीय स्टेट बँकेच्या शाखेत सर्व सामान्य माणसाला योग्य सेवा मिळत नाही. बँकेतील मॅनेजरसह




कर्मचारी मनमानी करीत असून सर्व सामान्यांना समाधान करण्याऐवजी अरेरावीच्या भाषेत उत्तरे देत असल्याने सर्व सामान्य माणसाच्या मनात नाराजीचा सूर पाहायला मिळत आहे. उमापूरच्या भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया या शाखेत बहुसंख्य नोकरदार, शेतकरी, शेतमजूर, व्यापारी, व्यावसायिक आदींची बँक खाती आहेत. या शाखेत दैनंदिन बँकिंग व्यवहार मोठ्या प्रमाणात होतात परंतु या शाखेचे मॅनेजर हे मनमानी पद्धतीने कारभार करून खातेदारांना अरेरावीच्या भाषेत बोलत असल्याने खातेदारांमध्ये संतापाची भावना आहे. सर्वसामान्यांना पैशांच्या देव-घेवीसह अन्य व्यवहारासाठी बँकेत जाणे अपरिहार्य ठरते. मात्र येथील मॅनेजर समाधानकारक उत्तरे देण्याऐवजी अरेरावीची भाषा वापरत असल्याने सर्व सामान्य माणसात संभ्रमित आहे. अशा मुजोरपणा करणाऱ्या मॅनेजर ची तात्काळ बदली करण्यात यावी अशी मागणी होत आहे.



## आंबाजोगाई इज्तेमासाठी जादा बसेस सोडा : नुमान चाऊस

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : इस्लाम व मानवतेची शिकवणूक देण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या इज्तेमाचा यावर्षीचा कार्यक्रम आंबेजोगाई येथील चांदमारी ग्राउंड सदर बाजार येथे दोन व तीन जानेवारी २०२५ ला होत आहे. मानवतेच्या कल्याणासाठी लोकांनी स्वत:ची वागणूक चांगली करावी तसेच अन्य समाज प्रबोधनाचे व्याख्यान तिथे होणार आहे. या अनुषंगाने त्यास उपस्थिती लावण्यासाठी मुस्लिम बांधव हजारोचे संख्येने प्रत्येक तालुका व गावातून येतील. लोकांचा प्रवास हा सुखरूप असावा व इतर प्रवाशांना गर्दीचा सामना करावा लागू नये तसेच एस टी महामंडळाला जास्त प्रवासी मिळवून फायदा व्हावा यासाठी इज्तेमा काळात माजलगाव आगारातून आंबेजोगाईला जादा बसेस सोडण्यात यावे अशी मागणी मौलाना आझाद युवा मंचचे बीड जिल्हा अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बीड जिल्हा उपाध्यक्ष नुमान अली चाऊस यांनी निवेदनाद्वारे माजलगाव एसटी आगर प्रमुख यांना केली आहे.

# आदर्श माता प्रतिष्ठानचे वतीने दिपक नंदकिशोर मोहिते यांना समाजरत्न पुरस्कार जाहीर



गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : दिपक नंदकिशोर मोहिते वय २८ अतीशय कमी वयात महाराष्ट्र भर नाव गाजविणारे पत्रकार अन्याय विरुद्ध आवाज उठविणारे, निर्भिड पत्रकार अतिशय कमी वयात त्यांनी महाराष्ट्र भर काम केले ते स्वतः महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना शेवगाव तालुका अध्यक्ष भारतीय ग्रामीण वार्ताहर विकास परिषदचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष, डॉ बाबासाहेब आंबेडकर विचारमंच उपाध्यक्ष विशेष पोलीस अधिकारी न्यूज चे मुख्य संपादक असुन महाराष्ट्र भर उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल त्यांना आदर्श माता प्रतिष्ठानचे वतीने समाजरत्न पुरस्कार मिळाला आहे पोलीस प्रशासन यांना सहकार्य करणे गोरगरीब जनतेचे प्रश्न शासनदरबारी मांडणे गोरगरीब जनतेला शासनाकडून अनुदान निधी मंजूर करून देणे असे अनेक कामे त्यांनी केली असेच काम त्यांनी पुढे ही करावे यासाठी त्यांना विशेष तपास न्यूज, न्यूज एक्स्प्रेस१८, दैनिक आरंभ,दै.क्रांतीकारी जयभीम, तिरंगा रक्षक, सर्व पत्रकार बांधवांच्या वतीने दिपक नंदकिशोर मोहिते यांना शुभेच्छा देण्यात आल्या

सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ
बीड (महाराष्ट्र) BEED (MAHARASHTRA)


# बीड प्रकरणात आरोपी फासावर लटकेपर्यंत स्वस्थ बसणार नाही

## आम्ही गुंडांचे राज्य चालवू देणार नाही, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही

बीडच्या संतोष देशमुख हत्याकांडातील आरोपी फासावर लटकेपर्यंत पोलिस स्वस्थ बसणार नाहीत, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी दिली. बीडच्या प्रकरणात आम्ही कुणालाही सोडणार नाही. या प्रकरणात ज्याचा संबंध ज्या प्रकरणात आढळेल त्या सर्वांवर कारवाई केली जाईल. आम्ही गुंडांचे राज्य चालवू देणार नाही. कुणालाही अशा प्रकारे हिंसा करता येणार नाही व खंडणी मागता येणार नाही, असे ते म्हणालेत.

बीडच्या मस्साजोग हत्याकांडाशी निगडीत खंडणी प्रकरणात पोलिसांना हवा असणारा वाल्मीक कराड आज अखेर सीआयडीपुढे शरण आला. त्याने पुणे स्थित सीआयडीच्या कार्यालयात आत्मसमर्पण केले.



त्याची सध्या चौकशी सुरू आहे. वाल्मीक कराड हा राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय आहे. त्यामुळे या प्रकरणाच्या निष्पक्ष चौकशीसाठी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. या पार्श्वभूमीवर वाल्मीक कराड पोलिसांना शरण आला आहे.

कुणालाही हिंसा करता येणार नाही, खंडणी मागता येणार नाही

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी भाष्य करताना बीडच्या प्रकरणात कुणालाही सोडणार नसल्याची ग्वाही दिली. ते म्हणाले, बीडच्या प्रकरणात आम्ही कुणालाही सोडणार नाही. या प्रकरणात ज्याचा संबंध ज्या प्रकरणात आढळेल त्या सर्वांवर कारवाई केली जाईल. अतिशय कडक कारवाई केली जाईल. गुंडांचे राज्य आम्ही चालवू देणार नाही. कुणालाही या प्रकरणी अशा प्रकारे हिंसा करता येणार नाही. खंडणी मागता येणार नाही. त्या दृष्टिकोनातून तपास अतिशय गतीशिल करण्यात आला आहे. त्यामुळेच त्यांना शरणागती पत्करावी लागली आहे.

### संतोष देशमुख यांना न्याय देणे हीच आमची भूमिका

पत्रकारांनी यावेळी मुख्यमंत्र्यांना मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याविषयी होणाऱ्या मागणीविषयी विचारले. त्यावर ते म्हणाले, मला या प्रकरणाच्या राजकारणात जायचे नाही. मी पूर्वीपासूनच सांगत आहे की, प्रस्तुत प्रकरणात कुणाकडे पुरावे असतील तर द्यावे. माझ्यासाठी स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या हत्येसाठी कारणीभूत असणाऱ्या लोकांना शिक्षा होणे हे महत्त्वाचे आहे. काही लोकांना केवळ राजकारण महत्त्वाचे आहे. त्यांचे राजकारण त्यांना लखलाभो. त्यांच्या राजकारणाने मला वाटत नाही की, फार फायदा होईल. मला त्यात जायचे नाही. मला त्याचे समर्थनही करायचे नाही किंवा विरोधही करायचा नाही. त्यांनी त्यांच्या ठिकाणी राजकारण करावे. पण संतोष देशमुख यांना न्याय मिळवून द्यायचा ही आमची भूमिका अत्यंत स्पष्ट आहे.

### सीआयडीवर कुणालाही दबाव टाकू देणार नाही

देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले, कोणता गुन्हा दाखल होईल, कसा होईल हे पोलिस सांगतील. हे पोलिसांचे काम आहे. प्रस्तुत प्रकरणात पुराव्यांच्या आधारावर कुणालाही सोडणार नाही हे मी स्पष्टपणे सांगितले आहे. यासंदर्भात पोलिस वेळोवेळी निर्णय घेतील. वेळोवेळी ब्रीफिंग करतील. ही केस जाणिवपूर्वक सीआयडीला देण्यात आली आहे. त्यांना पूर्ण स्वायत्तता देण्यात आली आहे. त्यांच्यावर कुणाचाही दबाव चालवून घेतला जाणार नाही. कुणालाही दबाव टाकू दिला जाणार नाही.

## आता प्रत्येक मजुराला मिळणार स्मार्ट रेशन कार्ड-मुख्यमंत्री फडणवीस

मुंबई ।प्रतिनिधी

कोणत्याही राज्यातून महाराष्ट्रात स्थलांतरित झालेल्या मजुरांना स्मार्ट रेशन कार्ड देण्यात येणार आहे. राज्यातील कुठल्याही रेशन दुकानात त्यांना धान्य उपलब्ध करा, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. पुढील शंभर दिवसांमध्ये करायच्या कामांचा आढावा घेण्यासाठी आयोजित केलेल्या बैठकीत ते बोलत होते. सह्याद्री अतिथीगृहात सोमवारी ही बैठक आयोजित करण्यात आली होती.



मुख्यमंत्री म्हणाले, आगामी वर्षात २५ लाख नवीन रेशन कार्डचे ई-केवायसी करून प्रमाणीकरण करा. मागील ६ महिन्यांत एकदाही अन्नधान्याची उचल न केलेल्या शिधापत्रिकांची तपासणी करावी. शिधापत्रिकामधून मयत व्यक्ती वगळाव्या, १०० पेक्षा जास्त वय असणार्या लाभार्थ्याची फेरतपासणी करावी. तसेच संगणकीकृत न झालेल्या १४ लाख लाभार्थ्यांचे नाव शिधापत्रिके त समाविष्ट करण्याकरिता विशेष मोहीम राबवावी. अन्नधान्य वाटपामध्ये लाभार्थ्यांना योग्य प्रमाणात धान्य वाटप व्हावे, यासाठी सर्व रास्त भाव दुकानां मध्ये इलेक्ट्रॉनिक वजन काटे बसवावेत. गरजू लाभार्थ्यांना सणांच्या काळात आनंदाचा शिधा वाटप करण्यात येतो. या आनंदाचा शिधा वाटपाची एक दिनदर्शिका तयार करण्यात यावी, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केल्या.

## पत्रकारितेत उल्लेखनीय कार्यासाठी आयेशा शेख यांना पुरस्कार जाहीर

बीड ।प्रतिनिधी

राष्ट्रमाता जिजाऊ आणि सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त तुलसी शैक्षणिक समूहाच्या वतीने विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा गौरव करण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे. या विशेष कार्यक्रमात माध्यम क्षेत्रातील दैदिप्यमान कार्याबद्दल आयेशा शेख यांना पत्रकारितेत उल्लेखनीय कामगिरीबद्दल पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

हा सन्मान सोहळा ४ जानेवारी २०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, संत ज्ञानेश्वर नगर, शासकीय आयटीआय मागे, बीड येथे संपन्न



होणार आहे.आयेशा शेख यांना मिळालेल्या या सन्मानामुळे सर्वत्र त्यांच्या कार्याचे कौतुक होत असून, त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. समाजातील महिलांना प्रेरणा देण्यासाठी आयोजित या कार्यक्रमाला महिलांच्या उत्स्फूर्त सहभागाची अपेक्षा आहे.

## केंद्रीय मंत्री रामदासजी आठवले यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

खुलताबाद ।हरिदास सराटे (दै.महाभारत)

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक राज्य न्याय मंत्री भारत सरकार संघर्ष नायक पँथर मा. रामदासजी आठवले यांच्या वाढदिवसानिमित्ताने मौजे खांडी पिंपळगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वही पेन वाटप करण्यात आले यावेळी उपस्थित आर पी आय तालुकाध्यक्ष फकीरराव भालेराव, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे, भाजपा तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर नलावडे, खुलताबाद पंचायत समितीचे माजी सभापती दिनेश अंभोरे, भाजपा किसान मोर्चा तालुकाध्यक्ष प्रकाश चव्हाण, भाजपा तालुका उपाध्यक्ष भागचंद जोनवाळ, उपसरपंच राहुल चव्हाण भाजपा युवा कार्यकर्ते अविनाश वेताळ, आर पी आय तालुका सरचिटणीस भाऊराव गवळे, पोलीस पाटील जनार्दन उबाळे, सोसायटी संचालक अशोक महालकर, ज्ञानेश्वर देवकर, आरपीआय तालुका सल्लागार अर्जुन भालेराव, आरपीआय शहर उपाध्यक्ष मिलिंद जाधव, ज्ञानेश्वर वेताळ, सोमीनाथ घुले, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष बाळू महालकर, सचिन महालकर, रफिक पठाण, अशोक पवार, राजेंद्र भालेराव,



दिलावर पठाण, विलास भालेराव, सिद्धार्थ भालेराव, सिंग जोनवाळ, मुख्याध्यापक श्री काळे श्री हडप श्रीमती महाजन , श्रीमती डोंगरदिवे श्रीमती काजे श्रीखंडे सर्व शिक्षक वृंद विद्यार्थी उपस्थित होते.



## संतोष देशमुख हत्या ही राज्याच्या अस्मितेला कलंक लावणारी घटना-ना. रामदास आठवले

केज । प्रतिनिधी

संतोष देशमुख यांची हत्या ही महाराष्ट्रासारख्या पुरोगामी समाजाला राज्याच्या अस्मितेला कलंक लावणारी घटना असून या हत्याकांड आणि खंडणी प्रकरणातील सर्व आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी. तसेच या प्रकरणाचा तपास जलद गतीने करण्यात यावा. यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि मुख्यमंत्र्याची देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचे केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी मस्साजोग येथे संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन प्रसार माध्यमाशी बोलताना सांगितले.

केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी दि. ३० डिसेंबर रोजी मस्साजोग येथे सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबाची भेट घेवून सांत्वन केले. यावेळी त्यांच्या सोबत युवा प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, बाबुराव कदम, मिलिंद शेळके यांच्यासह रिपाईचे नेते उपस्थित होते

बीड जिल्ह्यातील मस्साजोग तालुका केज येथील सरपंच संतोष देशमुख यांची हत्या ही पुरोगामी समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्याच्या अस्मितेला कलंक लावणारी आहे तसेच यां घटनेपूर्वी पवन ऊर्जा प्रकल्पात घडलेल्या घटनेची येथील सुरक्षा रक्षाच्या मारहाणीची प्रकरणी पोलिसांनी ट्रॉसिटीची तक्रार दाखल करून घेतली असती तर कदाचित ही घटना टाळता आली असती म्हणून जिल्ह्यात आणि राज्यात पोलिसांच्या कार्यपद्धतीवर रोष व्यक्त होत आहे. या घटनेतील गुन्हेगारांची प्रॉपर्टी जप्त करून भागणार नाही तर यातील आरोपींना पकडणे आवश्यक आहे. चार आरोपी पकडले असून अद्यापही तीन आरोपी फरार आहेत. इतर आरोपी ताब्यात घ्यायला एवढा वेळ लागतो ? महाराष्ट्र पोलीसासाठी ही चांगली नाही पोलिसांनी दवाखाली काम करू नये. हे जे प्रकरण आहे ते अत्यंत गंभीर आहे. सुरक्षा रक्षक अशोक सोनवणे हा सोलार प्रकल्पात काम करीत होते त्यांना मारहाण झाल्यामुळे

संतोष देशमुख हे भांडण सोडवायला गेले होते. त्यामध्ये ट्रॉसिटी लावणे अत्यंत आवश्यक होते. जर ट्रॉसिटी लावली असती आणि आरोपींना पकडले असते तर ही घटनाच घडली नसती. यामुळे पोलीसावर लोकांचा संशय आहे. हे अत्यंत गंभीर आहे.

## रुपाली चाकणकर जातीयवादी, यांची हाकलपट्टी करण्याची मागणी

मुंबई : राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांची हकालपट्टी करण्याची मागणी करण्यात येत आहे. रुपालीताईंना अभिनेत्री प्राजक्ता माळींना न्याय द्यायला वेळ आहे. पण, दलित महिलांना न्याय देण्यासाठी पुढाकार घेण्यास वेळ नाही.त्यामुळे महिला आयोगाच्या अध्यक्षपदावरून त्यांची हकालपट्टी करावी अशी मागणी भीम आर्मीने केली आहे.

बीडमधील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करण्यात आली. या हत्येमागील मास्टरमाईंड वाल्मिक कराड असल्याचा आरोप करण्यात येत आहे. भाजप आमदार सुरेश धस यांनी या प्रकरणावर भाष्य करताना अभिनेत्री प्राजक्ता माळींचे परळीतील कार्यक्रमाच्या अनुषंगाने नाव घेतले होते. त्यावर आक्षेप घेत अभिनेत्री प्राजक्ता माळीने धस यांच्याकडे बदनामी केल्याप्रकरणी माफी मागण्याची मागणी केली. तर, महिला आयोगाकडेही तक्रार केली होती. त्यावर महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी पोलिसांना पुढील कारवाईचे निर्देश दिले.

भीम आर्मीचे राष्ट्रीय सचिव अशोक कांबळे यांनी रुपाली चाकणकर या जातीयवादी असल्याचा आरोप केला. परभणीमध्ये पोलिसांनी कोम्बिंग ऑपेरेशन करून मागासवर्गीय महिलांवर हल्ला केला. त्याच्यावर अमानुष लाठीचार्ज केला. त्याचा विनयभंग केला. परंतु आजपर्यंत रुपालीताई चाकणकार यांना या मागासवर्गीय महिलांना न्याय देण्यासाठी पुढाकार घ्यावा वाटला नसल्याची टीका कांबळे यांनी केली.

रुपालीताई चाकणकर या प्रचंड जातीयवादी आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र



फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी लवकरात लवकर रुपाली चाकणकर यांना महिला आयोगाच्या अध्यक्षपदावरून हकालपट्टी करावी अशी मागणी देखील कांबळे यांनी केली आहे. चाकणकर यांची हकालपट्टी न केल्यास मुंबईतील महिला आयोगाच्या कार्यालयाबाहेर भीम आर्मीच्या माध्यमातून आंदोलनाचा इशाराही त्यांनी दिला आहे.

## आ. सुरेश धस, आ. संदीप क्षीरसागर यांनी घेतली मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट

### धनंजय मुंडेंना बिनखात्याचे मंत्री ठेवण्याची केली मागणी

**वाल्मीक कराड ३०२ मध्ये येऊ शकतो.**

**वाल्मीक कराडला व्हीआयपी वागणूक नको**

वाल्मीक कराड आपणहून पोलिसांना शरण आला आहे. आमचा पोलिस प्रशासनावर विश्वास आहे. मात्र, कराड याला सर्वसामान्य आरोपींप्रमाणेच वागणूक मिळावी. त्याला व्हीआयपी वागणूक दिली जाऊ नये, अशी मागणी जरांगे पाटील केली आहे.

मुंबई : सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण लावून धरणारे बीड जिल्ह्यातील भाजपचे आमदार सुरेश धस आणि शरद पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी मंगळवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सह्याद्री अतिथीगृहावर भेट घेऊन चौकशी पूर्ण होईपर्यंत धनंजय मुंडे यांना बिनखात्याचे मंत्री ठेवा, अशी मागणी केली.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी उचललेल्या पावलांमुळे शेवटी वाल्मीक कराडने शरणागती पत्करली आहे. त्याच्या मालमत्ता जप्त करण्यासाठी सरकारने न्यायालयाकडे परवानगी मागितली आहे. करोडोंची मालमत्ता जप्त झाल्याशिवाय कराड गँगचे अन्य गुन्हे उघड होणार नाहीत, असे आ. धस यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतल्यानंतर माध्यमांशी बोलताना सांगितले.

याप्रकरणात सुदर्शन घुले हा प्रमुख आरोपी असून त्याचा आणि प्रतीक घुले या दोघांचा जास्त सहभाग आहे. वाल्मीक कराड (आका) आता शरण आले



आहेत हे शंभर टक्के १२० व मध्ये आहेत; पण माझा अंदाज आहे जर त्यांनीही व्हिडीओ कॉल पाहिला असेल तर ते पण ३०२ मध्ये येऊ शकतात, असे धस म्हणाले.





छत्रपती शिवाजी महाराज यांचे वंशज व महाराष्ट्र राज्याचे नवनिर्वाचित सार्वजनिक बांधकाम मंत्री ना. छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची आज मंत्रालय, मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली. बीड विधानसभा मतदारसंघातील सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित प्रलंबित असलेल्या विविध कामांची पूर्तता होण्याबाबत सविस्तर चर्चा केली.

## संतोष देशमुख कुटुंबीय आणि गावकऱ्यांचा सामूहिक जलसमाधीचा इशारा

संतोष देशमुख यांची हत्येला आज २१ दिवस झाले. मुख्य आरोपी अटक करण्यात तपास यंत्रणेला अपयश आले असल्याने संतप्त नातेवाईक आणि गावकऱ्यांनी उद्या (दि.१) जानेवारी रोजी सामूहिक जलसमाधी घेणार असल्याचे पत्र तहसीलदार यांना दिले आहे.त्यामुळे खळबळ उडाली आहे.बीड जिल्ह्यातील मस्साजोग ता. केज येथील सरपंच संतोष पंडीतराव देशमुख यांचे टोल नाक्यावरून अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली होती. या घटनेला २२ दिवस उलटून देखील संशयित आरोपी अटक करण्यात तपास यंत्रनेला अपयश आलेले आहे. त्यामुळे दि. १ जानेवारी २०२५ रोजी संतोष देशमुख यांच्या कुटुंबातील सदस्य आणि गावकरी हे मस्साजोग येथील तलावात जलसमाधी घेणार असल्याचे निवेदन गावकऱ्यांनी आज दि. ३१ डिसेंबर रोजी तहसीलदार केज यांना दिले आहे.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागा तील अधिकारी कर्मचारी

## नवीन वर्षाच्या थंब मशीनद्वारे पगार काढण्याचा संकल्प करावा !

बीड (प्रतिनिधी)

घोटाळा आणि बीड जिल्ह्यातील पाणी प्रश्न आता पुन्हा एकदा गाजणार आहे कारण भर हिवाळ्या पावसाळ्यात सुद्धा बीडच्या जनतेला पाणी नाही तर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे अनेक कर्मचारी हे के बी चिवरेयांच्या कार्यक्रमांमध्ये आपणा घर कभी भी आजाओ म्हणण्यासारखी गत होती त्यामुळे आठवड्यातून दोन दिवस कर्मचारी हजर सहा दिवस गायब असाच प्रकार म्हणावा लागेल त्यातच मात्र बीड जिल्हा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग कार्यालयाचा दांडी बहाद्दर कर्मचारी

श्री.बी.एस.ठाकूर उपलेखापालयांच्या मुळे बीड जिल्ह्याची-मजीप्राची प्रतिमा मलीन होत आहे कारण, श्री.बी.एस.ठाकूरकडे बीड विभाग येथील विभागीय लेखापालपदी तात्पुर्ती नियुक्त करण्यात आलं. श्री.ठाकूर हे आठवड्यातून फक्त दोन ते तीन दिवस हजर असतात आठवड्यातून - गुरुवारी दुपारून निघुन जाणार - शुक्रवारी - दांडी मारणार - शनिवार रविवारी सुट्टी - सोमवार दांडी मारणार- मंगळवार दुपारून येणार हे सत्य आहे - याची दैनिक महाराष्ट्र आरंभ बीड प्रतिनिधीनी खात्री केली - इतर कर्मचारी दांड्या मारतात- विभागीय लेखापाल श्री ठाकूर यांना शासनाच्या नियम लागू होत नाही का ? आठवड्यातुन दोन ते तीन दिवस उपस्थिती तरीपण पूर्ण महिन्याचे पगार कसं निघतो? श्री ठाकूर हे संभाजीनगर येथील वरिष्ठ अधिकारी यांना हप्ता गोळा करून दोतो त्यामुळे त्याला विशेष सुट देण्यात येते अशी चर्चा - श्री ठाकूर याचे दांड्यामारण्याचे कारणे - लग्न - डिलिव्हरी - मौतीला जायचं - आजारपण- असे अनेक कारण सांगून दांड्या मारून नांदेडला निघून जातात.श्री ठाकूर हे चौकीदार पद पासुन उपलेखापालपदा पर्यंत कार्य कसं केलं - फाईल लपवा लपवी - हिंगोली जिल्हा परिषद येथील तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांना श्री. ठाकूर यांना निलंबन केले होते अशी चर्चा - ठेकेदार - कर्मचारी यांचेकडून पैश्याची मागणी ? बीड जिल्ह्याची बदनामी



- ऑफिसच्या वातावरण गढूळ - थंब मशीनचा वापर का होत नाही - श्री.ठाकूर साहेब आपण जिल्ह्यात येऊन बेईमानी करू नका - श्री. चिवरे यांचे सेवानिवृत्त च्या कार्यक्रम मध्ये सुद्धा अपना पैश्याचा अपहार केलं लोकांनी दिलेल्या वर्गणीत ही तुम्ही डल्ला मारला - लाजिरवाणी बाब आहे -

बीड येथील कार्यकारी अभियंता म्हणून श्री खराटे साहेब यांचेकडे शासनाने जिम्मेदारी सोपविली कारण आपण एक प्रतिष्ठित आणि मजीप्राचे अग्रणी सिव्हिल इंजिनियर विद्वान आहेत,आपण एक अभियासू अभियंता आहे आपणास प्रशासनाचा व सिव्हिल इंजिनिअरचं दांडगा अभ्यास आहे. खराटे साहेब आपण खुप हुशार आहे - तुमची मजीप्रा जिल्ह्याला गरज आहे बीड जिल्हा तहाणलेला आहे. आपण ठाकूरच्यानादी लागून आपली इज्जत कामी करून घेऊन नये ठाकूर हा शिस्तीचं पालन करीत नाही- बीड जिल्ह्याची बदनामी - मजीप्राची प्रतिमा मलीन होत आहे खराटे साहेब आपणास विनंती सायंकाळी दैनिक महाराष्ट्र आरंभ मधील मागील अंक मध्ये प्रकाशित सविस्तर अंक वाचा - कार्यवाही करा-

१)१९.११.२४ - महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बीड विभागातील ५०० कोटीच्या घोटाळ्याची मनीषा पलांडे मॅडम आपण चौकशी करणार का?

२) १०.१०.२४ - कोट्यावधी रुपयांच्या बिलाच्या टक्केवारी मध्ये बी.एस.ठाकूर छापू लागला मंदिर बांधकामच्या पावतीवर पैसे?

३) ०७.१०.२४ - दिढ कोटीचे एक्स्ट्रा आयटम करण्याऐवजी त्यांनी स्वतंत्र निविदा का मागितली नाही - मनीषा पलांडे मॅडम यांनी लक्ष देणे गरजेचे.

४) १६.०९.२४ - महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिकाऱ्यांना टक्केवारीवर नाचविणारा मदारी कोण?

५) एक्सट्रा आयटमच्या गोंडस नावाखाली कोळ्याने शासनाच्या तिजोरीवर जाळे टाकले?

६) १०.०४.२४ - गांधीजी के तीन बंदर एक अंदर एक कामपर,एक बाहेर और एक अंदर या सगळ्यांचा मदारी कोण?

७) ०३.०४.२४ - लोलापोड, दिपक कोळी, चिवरे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग बीडच्या तिजोरीवर दरोडा टाकत आहे, १२१कोटीची खैरात मार्च अखेर पर्यंत वाटली?

८) ०६.०४.२४ - महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या कल्लप्पाचा नंगानाच - जनतेला वेठीस धरण्याचे काम कल्लाप्पा चिवरे कडून.

९)२४.०१.२४ - अमृत की स्लो पाईजन?

१०) २२.०३.२४ - १०० कोटी प्रगती कॅन्स्ट्रॅकशनने बोरी बिस्तर घेऊन फरार होत आहे? के बिचुरे यांच्या कार्यामत कार्यकाळामधला कोट्यावधी रुपयाचा घोटाळा व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागातील अनेक समस्या हे आता नवनिर्वाचित अधिकारी खराटे यानी सर्व अधिकारी कर्मचारी यांना थांब द्वारे हजेरी देण्यास बंधनकारक करावे तसेच कोट्यावधी रूपाचा बीड जिल्ह्यातील पाणी प्रश्नावरचा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण च्या घोटाळा व अनेक तक्रारींचेही चौकशी करणे गरजेचे आहे.बीड जिल्हा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयातील दांडी बहाद्दर लेखापाल बीएस ठाकूरची ही सखोल चौकशी झाली पाहिजे गेल्या २०२३ मध्ये संबंधित प्रकरणांमध्ये ठाकूर यांनी अनेक वेळा दांड्या मारलेले आहेत व नवीन वर्षाचे दाणे मारायला सुरुवात करत आहे म्हणून थम मशीन द्वारे पगार काढला जावा अशी मागणी कर्मचाऱ्यांमध्ये दबक्या आवाजात चालू आहे

# गेवराईत राहणार तिसऱ्या डोळ्यांची नजर, पोलिसांना मिळणार मदत

## शहरात बसविणार १७१ सिसिटिव्ही कॅमेरे; गुन्हेगारीला बसणार चाप..!
## गुन्हेगारांना कदापि माफ करणार नाही - पोलीस निरीक्षक प्रवीणकुमार बांगर

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : वाढत चाललेल्या गुन्हेगारीला चाप बसावा या हेतुने गेवराई शहरावर २०२५ वर्ष प्रारंभ होताच आता तिसऱ्या डोळ्यांची नजर राहणार असून,जानेवारी अखेर शहरातील सिसिटिव्ही कॅमेरे बसविण्याचे काम पूर्ण होईल अशी माहीती देण्यात आली आहे. गेवराई शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे.लोकसंख्या जवळपास ४० हजाराच्या आसपास पोहचलेली आहे. शहराचा विस्तार वाढत तर आहेच शिवाय जुनी गेवराई व नवीन गेवराई भागही पडले आहेत. शहरातील वाहन चोरीच्या, घरफोडी याशिवाय दुकानातील चोरीच्या घटना, तसेच अवैध वाळू उपसा वाहतूक सह इतर गुन्हेगारीच्या घटना वाढत चालल्या आहेत.


मात्र, यापुढे आता गेवराई शहरात प्रवेश होताच अन् शहरातुन बाहेर जाई पर्यंत सिसिटिव्ही कॅमेऱ्यांच्या नजरकैदेत प्रत्येकजण असणार आहे.डिपीडीसी मधुन यासाठी निधीची तरतूद करण्यात आलेली असून, एका खासगी कंपनीला कॅमेरे बसविण्याचे कंत्राट दिले असून, हे काम सुरु झाल्याने जानेवारी अखेर हे काम पुर्ण होईल असे सांगण्यात आले आहे.

गेवराई शहरातील मुख्य चौकात १३ ठिकाणी फिरते सिसिटिव्ही कॅमेरे

गेवराई शहरातील मुख्य चौकात १३ फिरते सिसिटिव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत.या कॅमे-याची नजर २५० मिटर पर्यंत असणार आहे.तर शहरातील पांढरवाडी फाटा ते गेवराई बीड रस्त्यावरील छत्रपती संभाजी महाराज चौक, झमझम पेट्रोल पंप या सर्व रस्त्यांवर जाणारे व येणाऱ्या वाहनांचे नंबर शहरातील पोलिस ठाण्यात दिसणार आहेत.

४५ चौकात १७१ सिसिटिव्हिची असणार नजर

गेवराई शहरातील पांढरवाडी फाटा, जमादरणीचा पुल, संजय नगर प्रवेश ठिकाणी, नवीन बसस्थानक,



छत्रपती शिवाजी महाराज चौक, जुने बसस्थानक, उपजिल्हा रुग्णालय, पंचायत समिती, कोल्हेर वेस, जुनी गेवराई, मिरवणूक मार्ग, ताकडगाव रोड, मन्यारवाडी रस्ता, कोल्हेर रस्ता, संजय नगर, गजानन नगर, भगवान नगर, नगर परिषद वसाहत, शिवाजी नगर, वादे नगर, स्टेडियम रस्ता, सेवालाल नगर चौक, सेंट झेवियर्स विद्यालय, एन.के.व न्यू हायस्कूल, जातेगाव रोड, मोंढा रस्ता, प्रथमेश गॅस एजन्सी सह ४५ चौकात १७१ सिसिटिव्ही कॅमेरे बसविण्यात येणार असून, याचे काम सुरू झाले असून नवीन वर्षाच्या पहिल्या महिन्यात हे सर्व सिसिटिव्ही कॅमेरे सुरू होऊन या शसरातील सर्व चित्र गेवराई पोलिस ठाणे येथे दिसणार आहे. असे पोलिस निरीक्षक प्रवीणकुमार बांगर यांनी सांगितले.

पोलिस तपासात येणार गती

गेवराई शहरातील घरफोडी,दुकानातील चो-या शिवाय दुचाकी आणि चारचाकीच्या घटना यापूर्वी घडलेल्या असताना पोलीसांना धागेदोरे हाती लागत नव्हते.आता मात्र गेवराई शहरावर तिस-या डोळ्यांची नजर राहणार असल्याने गुन्हेगारीला चाप तर बसणार असून, एखादी घटना झाल्यास या घटनेचा तपास करताना पोलीसांना आता सिसिटिव्ही कॅमे-यामुळे मदत मिळणार आहे.

कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी आमची पोलीस यंत्रणा सज्ज असून, गुन्हेगारांना कदापि माफ करणार नाही. वाढत चाललेल्या गुन्हेगारीला चाप बसावा यासाठी २०२४ चा वर्षे प्रारंभ होताच आता गेवराई शहरातील विविध मुख्य चौकात सिसिटिव्हि कॅमेरे बसविण्यात येणार आहे. यामुळे पोलीसांना मदत मिळणार आहे. यापुढे गुन्हेगारांना कदापि माफ करणार नाही.

- पोलीस निरीक्षक प्रवीणकुमार बांगर

# प्रशासनावर पक्कड निर्माण करण्याचं आव्हान ?

## आमदार सुरेश धस यांच्याकडून सर्वसामान्यांना अपेक्षा

सुरेश/कांबळे

आष्टी प्रतिनिधी. आमदार सुरेश (आण्णा ) धस यांच्या रूपाने आष्टी पटोदा शिरूर तालुक्याला एक खमके व अभ्यासू झुंजार आमदार मिळाले आहेत त्यामुळे मतदारसंघात कामाला नक्कीच गती मिळेल अशी अपेक्षा आता जनतेला वाटू लागली आहे. तर मध्यन्तरीच्या कालावधीत प्रशासनावरील कमी झालेली पक्कड आता आमदार धस यांच्यामुळे सुधारेल त्यामुळे सामान्यांना त्यांच्याकडून मोठ्या अपेक्षा आहेत कामात आमदार सुरेश धस हे किती तत्पर आहेत हा प्रत्यक्ष अनुभव रविवार दिनांक २९ रोजी त्यांच्या निवासस्थानी मतदारसंघातील सरपंच उपसरपंच ग्रामसेवक ग्राम रोजगार पंचायत समिति सर्व अधिकारी जिल्हा परिषदेचे सर्व अधिकारी तलाठी मंडळ अधिकारी यांची त्यांच्या निवासस्थानी संवाद बैठक घेऊन मला सरकारी कामात हाताळगजरीपणा चालणार नाही जनतेचे कामे वेळेवर झाले पाहिजेत काम जमत नसेल तर आपण खुशाल बदली करून जाऊ शकता पण लोकांचे प्रशासकीय काम बाबतीत माझ्याकडे तक्रार आल्यास घरी केली जाणार नाही असे आमदार धस यांनी बोलून दाखवले यावरून त्यांचे प्रशासनावरील पकड मजबूत असल्याचे दिसते शासन व लोकप्रतिनिधी यांनी ठरवलेल्या धोरणाची अंमलबजावणी करण्याचे महत्त्वाचे काम प्रशासन करीत असते त्याचबरोबर नागरिकांना संबंधित सोयी सुविधा पुरवण्याची जबाबदारी प्रशासनाची असते परिणामी शासनाचे लोकप्रतिनिधीचे यशापयश अप्रत्यक्षरीत्या प्रशासकीय व्यवस्थेवर आधारित असते त्यामुळे लोकप्रतिनिधींनी प्रशासनावर पकडून वचक निर्माण करण्याची गरज असते तहसील कार्यालयात विविध योजना रेशन कार्ड संबंधित कामे पंचायत समिती अंतर्गत विहिरीचे कामे आधीसाठी नागरिकांची वर्दळ असते किरकोळ कामे महिने महिने रखडत असल्याची वस्तू स्थिती आहे बेकायदेशीर गौण खनिज अवैध वाळ उपसा हे मुद्दे दिवसेंदिवस गंभीर बनत चालले आहेत जलजीवनचे कामे झाली त्यात अनेकांनी मलिदा लाटला तर अनेक कामे वादाचे भावर्यात आहेत व रस्त्याचे कामे होताना मार्गदर्शक सूचनेची कितपत पालन होते याकडे लक्ष देण्याची गरज आहे रस्ते कामाचा दर्जा उंचावण्याची आव्हान आहे दुय्यम निबंधक कार्यालय भूमी अभिलेख कार्यालय आदींची अवस्था ही वेगळी नाही एखाद्या कागदासाठी छोट्या परवाण्यासाठी कित्येक हेलपाटे लाभार्थ्यांना मारावी लागतात व अधिकाऱ्यांची मर्जी सांभाळावी लागते त्यातच सर्व शासकीय कार्यालयात दलाचा विळखा असतो दलाला शिवाय पान हालत नसल्याने सामान्यना नाहक भुर्दंड सहन करावा



लागत आहे सहन करावा लागतो त्यामुळे आमदार सुरेश (आण्णा) धस तुम्हाला शासकीय कार्यालयांच्या कारभाराकडे अधिक अधिक याकडे लक्ष द्यावे लागणार आहे

# दलालां मार्फत परराज्यातील मजूरांकडून वेठबिगारीची कामे

माजलगावः गुन्हा दाखल करण्यास पोलिसांची टाळाटाळ माजलगाव, सुनिल थोरात महाराष्ट्रातील विदर्भ व मध्य प्रदेशातील काही जिल्ह्यातून दलालामार्फत काही त्री-पुरुषांना जास्त पैशाचे आमीष दाखवुन मोल मजुरी करण्यासाठी माजलगाव तालुक्यात अनेक ठिकाणी त्यांच्याकडून काम करून घेतले जात होते. मागील अनेक दिवसापासून या मजुरांचे संबंधित व्यक्तीकडून शोषण करून वेठबिगारीस मजबूर केले जात आहे. याबाबत सामाजिक कार्यकर्ते सत्यभामा सौंदरमल यांनी अनेक मजुरांना ग्रामीण पोलीस ठाण्यात दोन दिवसापासून आणले असता पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ करण्यात येत असल्याचे सांगितले जाऊ लागले आहे.

विदर्भातील अमरावती व भंडारा त्याचबरोबर मध्यप्रदेशमधील छिंदवाडा येथील मजुरी करणाऱ्या कुटुंबास जास्तीची मजुरी देण्याची लालच दाखवून तालुक्यातील शिंद- ऋवाडी, देवखेडा, मालीपारगाव यासह काही गावात गुन्हाळात मजुरी करण्याची सांगत आणण्यात आले होते.मात्र या मजुरांना गुन्हाळात काम देण्याऐवजी शेतातील कापूस वे चणीचे काम करून घेत त्यांना तुटपुंजी मजुरी देत त्यांच्याकडून वेठबिगारीदोन दिवसापासून ग्रामीण पोलिस ठाण्यात मजुरांचा ठिय्या.दोन दिवसापासून आम्ही या सर्व मजुरांना घेऊन ग्रामीण पोलीस ठाण्यासमोर थंडीमध्ये बसलेलो आहोत. याबाबत पोलिसांना मजुरांना घेऊन येणाऱ्या व्यक्ती बाबत सर्व माहिती दिली असताना देखील पोलिसांकडून दोन दिवसापासून





वेटविघारीचा गुन्हा दाखल केला नाही. सध्या पोलीस ठाण्यासमोर १५ मजूर आलेले असून अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात मजूर असल्याचे या मजुरांकडून सांगितले जात आहे. या मजुरांकडे सर्व कागदपत्रे व आधार कार्डचा पुरावा उपलब्ध आहे. - सत्यभामा सौंदरमल, सामाजिक कार्यकर्ते

करण्याचे काम करून घेतले गेले. या मजुरांना एका दलालामार्फत आणण्यात आले होते. संबंधित दलालाने काही मजुरांना दोन महिन्यापूर्वी, काही मजुरांना एक महिन्यापूर्वी व काही मजुरांना पंधरा दिवसांपूर्वी या ठिकाणी आणले होते. यातील काही जण पळून देखील गेल्याचे सांगितले जात आहे. याबाबत सामाजिक कार्यकर्ते सत्यभामा सौंदरमल यांना याची माहिती मिळाल्यावर त्यांनी शनिवारी सकाळी या मजुरांची भेट घेतली. व त्यांची सर्व माहिती करून घेतल्यानंतर त्यांनी शनिवारी दुपारी पाच महिला, दहा पुरुष व एक नऊ सदरील मजूर आमच्याकडे आले असता सदरील मजुरांबाबत आम्ही चौकशी करत असून या मजुरांकडील कागदपत्र व आधार कार्डची पाहणी करून याबाबत गुन्हा दाखल करण्याचा निर्णय घेण्यात येईल. - बालक कोळी, पोलीस निरीक्षक ग्रामीण पोलीस स्टेशन महिन्याचा बालकास ग्रामीण पोलीस ठाण्यात घेऊन येत येथील पोलीस निरीक्षक बालक कोळी यांना घडलेल्या सर्व प्रकारची माहिती दिली. परंतु बालक कोळी यांनी सदर प्रकाराबाबत गांभीर्याने घेतले नाही व वेठबिगारीचा गुन्हा दाखल करून घेतला नसल्याचा आरोप देखील सत्यभामा सौंदरमल यांनी केला आहे. सदर मजूर दोन दिवसापासून ग्रामीण पोलीस ठाण्यासमोर ठाण मांडून बसलेले आहेत. दोन दिवस उलटले असताना देखील पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेण्यास टाळाटाळ का करत आहे याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होऊ लागला आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT